138

## VPC'S RENOWNED ECONOMICS BOOKS
(for Graduates, Post graduates & Competitions)

| | |
|---|---|
| Macro Economic Analysis (English/Hindi) | K.C. Rana & K.N. Verma |
| Micro Economic Theory (English/Hindi) | K.N. Verma |
| Economics of Development and Planning (English/Hindi) | M.L. Taneja & R.M. Myer |
| International Economics (English/Hindi) | K.C. Rana & K.N. Verma |
| Leading Issues in Agricultural Economics (English/Hindi) | R.N. Soni & Sangeeta Malhotra |
| Public Economics (Theory & Practice) (English) | Om Parkash |
| Public Economics (Theory & Practice) (Hindi) | Om Parkash & Dharmendra Singh |
| A Textbook of Econometrics | S. Shyamala & Navdeep Kaur |
| Economics of Public Finance | Om Parkash |
| Economic Thought (Hindi) | Dharmendra Singh |
| Labour Economics (Hindi) | Dharmendra Singh |
| Demography (Hindi) | J.C. Pant |
| Understanding Economics thru' Analysis & Applications | Ruchi Gupta |

## BOOKS AS PER CBCS PATTERN


| | |
|---|---|
| Introductory Micro Economics (Sem.I) Hons./GE | K.N. Verma |
| Introductory Macro Economics (Sem.II) Hons./GE | K.N. Verma |
| Statistical Methods for Economics (Sem.III) Hons | Navdeep Kaur & Sarabjit Kaur |
| Intermediate Micro Economics I (Sem.III) Hons. | K.N. Verma |
| Intermediate Macro Economics I (Sem.III) Hons. | K.N. Verma |
| Intermediate Micro Economics II (Sem.IV) Hons. | K.N. Verma |
| Intermediate Macro Economics II (Sem.IV) Hons. | K.N. Verma |
| Essentials of Public Economics (Sem.IV) Hons./DSE/GE | Om Parkash & Meenu Soni |
| Introductory Econometrics (Sem.IV/V) Hons./DSE/GE | S. Shyamala & Navdeep Kaur |
| Development Economics I (Sem.V) Hons. | M.L. Taneja & R.M. Myer |
| Development Economics II (Sem.VI) Hons. | M.L. Taneja & R.M. Myer |
| Essentials of Public Finance & Public Economics | Om Parkash & Meenu Soni |
| Principles of Micro Economics I&II (Sem.I&II) Pass/GE | K.N. Verma |
| Principles of Macro Economics I&II (Sem.III&IV) Pass/GE | K.N. Verma |
| Micro Economics (Sem.I) Hons. GE | K.N. Verma |
| Macro Economics (Sem.II) Hons. GE | K.N. Verma |
| Business Statistics (Sem.III) Pass/Hons. GE | Navdeep Kaur & Sarabjit Kaur |

VISHAL PUBLISHING CO.

Shop online at amazon.in

शाश्वत आणि सर्वसमावेशक जागतिकीकरण

# शाश्वत आणि सर्वसमावेशक जागतिकीकरण



• मुख्य संपादक •
स्नेहा विनायक देशपांडे

• संपादक मंडळ •
• सत्यप्रिय इंदूरवाडे • समित माहोरे
• धीरज कदम • अपर्णा समुद्र
• हितेश दडमल • समीर सिद्धिकी

VISHAL PUBLISHING CO.

| | | |
|---|---|---|
| १४) | जागतिक व्यापार संघटनेचा भारतातील कापूस पिकाच्या अर्थशास्त्रावर पडणारा परिणाम<br>—सुनील घुगल | 61 |
| १५) | जागतिकीकरण आणि भारतीय दारिद्र्य<br>—रक्षित मदन बागडे | 66 |
| १६) | व्यापार—उद्योगातून जागतिकीकरण होण्यास जाहिरात कलेचा सहभाग — एक अभ्यास<br>—अमोल कृष्णराव गुल्हाने | 70 |
| १७) | जागतिकीकरण आणि दृश्य कला यातील आंतर—बाह्यसंबंध<br>—सदानंद चौधरी | 75 |
| १८) | आर्थिक सुधारणांचे संक्रमण<br>—विठ्ठल घिनमिने | 79 |
| १९) | जागतिकीकरणाचे ग्रामीण समुदायावरील परिणाम<br>—पंढरी मोरे, रवींद्र बी. शेंडे | 84 |
| २०) | वैश्वीकरण के उपभोक्तावाद में विज्ञापन की भूमिका तथा भविष्य का अध्ययन<br>—आशीष गंगाधर उजवणे | 88 |
| २१) | बाजार में डिजिटलाइजेशन: न्यू विज्ञापन मिडिया के व्यवसायिक स्रोत<br>—उज्ज्वल एम. कडांडे | 92 |
| २२) | नाट्य शास्त्र में नायक—नायिका भेद का महत्त्व: कलात्मक अध्ययन<br>—मयुक्ता थोरात | 96 |
| २३) | जागतिकीकरण और वित्तीय समावेशन<br>—हर्षना सोनकुसरे | 99 |

# जागतीकरणाचे ग्रामीण समुदायावरील परिणाम

पंढरी जी. मोरे, रविंद्र बी. शेंडे

## प्रस्तावना:—

देशाचा विकास किंवा प्रगती करण्याच्या दृष्टीने १९८४—८५ मध्ये भारताचे पंतप्रधान माननिय श्री.राजीव गांधी यांनी नवीन आर्थिक धोरणाची संकल्पना मांडली. त्याच वेळी भारताचे वित्तमंत्री डॉ. मनमोहन सिंग हे होते. त्यांनी नवीन आर्थिक धोरणाची देशामध्ये अमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला परंतु तो अयशस्वी ठरला. १९९० मध्ये भारताचे पंतप्रधान माननिय श्री.पी.व्ही.नरसिंहराव हे झाले.त्यावेळी सुद्धा भारताचे वित्तमंत्री डॉ.मनमोहन सिंग होते. त्याच काळात १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण राबविण्यात आले. आणि तेव्हा पासून देशात जागतीकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाला सुरूवात झाली. १९९१ मध्ये देशात नवीन आर्थिक धोरण हे देशाच्या विकासाला किंवा प्रगतीला अधिक महत्वपूर्ण ठरले. १९९१ मध्ये देशात नवीन आर्थिक धोरण, नवीन औद्योगिक धोरण व नवीन वित्तीय धोरण राबविण्यात आले. खऱ्या अर्थाने देशाचा आर्थिक विकास व्हायला सुरूवात झाली. देशामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार प्राप्त व्हायला लागला. त्यामुळे जागतीकीकरण ही देशाच्या अर्थव्यवस्थेला व्यापक वैश्विक अर्थव्यवस्थेचा भाग बनली.

आर्थिक सुधारणा व्यवस्थितरित्या पार पाडाव्यात, आंतरराष्ट्रीय पातळीवरचे देवाण—घेवाण, व्यवहार मालमत्ता, हस्तांतरणाचे व्यवहार सुलभ व्हावेत, पारदर्शक व्हावेत, या दृष्टीने संरचनात्मक धोरणात्मक अशा स्वरूपाचे करण्यात आलेले बदल म्हणजे "आर्थिक सुधारणा" होय.

आर्थिक सुधारणा ही अखंडीत प्रक्रिया असून ती सर्व देशामध्ये सारखी चालू असते. कृषी, औद्योगिक क्षेत्र ,सेवा क्षेत्र. यामध्ये काळानुरूप जसे बदल होतात तसेच बदल आर्थिक क्षेत्रातही होतात त्यातूनच नवीन आर्थिक सुधारणा या प्रमुख संकल्पने अंतर्गत पुढील तीन उपसंकल्पनांचा अंतर्भाव होतो

१) उदारीकरण २) खाजगीकरण ३) जागतीकीकरण

नवीन आर्थिक सुधारणा सातत्याने चालणारी प्रक्रिया असून ती सर्व देशामध्ये (विकसित,विकसनशिल, अल्प विकसित) सारखीच चालू असते. गतिमान अर्थव्यवस्थेत कोणतीच गोष्ट कायम स्वरूपी स्थिर राहत नाही. उत्पादन—तंत्रज्ञान, व्यवस्थापन पद्धती अशा सर्वच क्षेत्रात बदल होतात.

वर्तमान काळात जगामध्ये अनेक माहिती तंत्रज्ञान व दळणवळण क्षेत्रात क्रांतीकारक बदल होत आहे.या तंत्रज्ञानाच्या युगात संपुर्ण जग हे लहान झालेले आहेत. भारतासह अनेक देशात उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतीकरण यांच्या संबधात चर्चा सुरू आहे. जर भारताने नवीन आर्थिक धोरण १९९१ मध्ये स्वीकारले असले तरी याचा पाया मात्र ८० व्या दशका पासून सुरू होतो. १९९० नंतर खऱ्या अर्थाने भारतावर सखोल परिणाम होण्यास सुरूवात झालेली आहे. यामध्ये जागतीक मुक्त व्यापार किंवा जागतीकीकरणाने भारतीय अर्थव्यवस्थेवर व ग्रामीण समुदायावर काय परिणाम झाले आहे.याचे विश्लेषण करण्यात आले आहे

## जागतीकीकरणाचा अर्थ:—

जागतीकरण म्हणज अशी प्रक्रिया आहे की जी देशाच्या अर्थव्यवस्थेला वैश्विक अर्थव्यवस्थेचा एक भाग बनविते.देशातील सर्व प्रकारच्या उदा. वस्तूंची, सेवांची, उत्पादन घटकांची आणि वित्तीय व्यवहार हे व्यापक जागतिक बाजारपेठांचा भाग बनतात. जगातील सर्व देशांनी जागतीक बाजारपेठ निर्माण करण्यासाठी सर्व देशांनी एकत्र जागतीक बाजार व्यवस्था अस्तित्वात आणणे म्हणजे जागतीकीकरण होय. जागतीकीकरणामुळे व्यवसाय, उद्योग,व्यापारात वाढत जाणारा विस्तार की ज्याला कोणत्याही देशाच्या भौगोलिक सीमारेषेची मर्यादा नाही त्यामुळे

जागतीकीकरणासंबधी विविध अर्थतज्ञांनी दिलेल्या व्याख्यांचा अभ्यास करणे उपयुक्त ठरेल.

## १) जगदीश भगवती यांच्यामते:—

जागतिकीकरण म्हणजे राष्ट्रीय अर्थव्यवस्थांना जागतीक अर्थव्यवस्थामध्ये पुढील प्रकियाद्वारे सामाविष्ठ करून घेणे .बहुराष्ट्रीय कंपन्या,व्यापार व महामंडळे यांच्याकडून प्रत्यक्ष गुंतवणूक, अल्पकालीन भांडवलप्रवाह, कामगार व एकूण मानवाची आंतर्राष्ट्रीय गतिमानता आणि तंत्रज्ञानाचा प्रवाह होय.

## २) जागतिक बॅंक:—

जागतिक बॅंकेने जागतिकरणच्या अर्थ पुढील प्रमाणे लावला आहे. जागतीकीकरण म्हणजे उपभोग्य वस्तूंसह सर्व वस्तूच्या आयाती वरील निर्बंध हळूहळू कमी करणे.आयाती दर/कर कमी करणे, सार्वजिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण होय.

## जागतीकीकरणच्या काळात ग्रामीण समुदायाची रोजगार परिस्थिती:—

जागतीकीकरणाच्या काळात ग्रामीण समुदायाची परिस्थिती बघितल्या कारणी अनुकूलता दिसून येत नाही. मात्र रोजगाराची बाबतीत बघितल्यास तर असे दिसून येते की, ग्रामीण भागातील सरासरी मासिक मिळकत स्वयंरोजगार, नियमित वेतन, कत्राटी कामगार, प्रासंगिक मजूर यामध्ये कशा प्रकारची असते हे खालील कोष्टकावरून दिसून येते.

**तक्ता क्र. १**

**सरासरी मासिक मिळकत**

| स्वयंरोजगार | नियमित वेतन | कत्राटी कामगार | प्रासंगिक मजूर | |
|---|---|---|---|---|
| कामावर असलेले लोक | ८६.६ | १०.० | ३.७ | ३२.८ |
| ५,००० रु पर्यंत | ६१.३ | १८.७ | ३८.५ | ५९.३ |
| ५,००१ रु ते ७,५०० रु | २६.२ | ११.५ | २७.१ | २५.० |
| ७,५०१ रु ते १०,००० रु | १३.८ | ११.० | २०.३ | १२.० |
| १०,००१रु ते २०,००० रु | ११.१ | २३.६ | ११.० | ३.५ |
| २०,००१रु ते ५०,००० रु | ३.५ | १७.७ | २.१ | ०.३ |
| ५,०००० १रु ते १०,००००० रु | ०.४ | १.८ | ०.१ | ०.० |
| १०,००००० च्या पुढे | ०.१ | ०.३ | ०.० | ०.० |

स्त्रोत :—वार्षिक रोजगार — बेरोजगार अहवाल सर्वेक्षण २०१५—१६,लेबर ब्युरो

जागतीकीकरणाच्या काळात ग्रामीण क्षेत्रात रोजगार ची स्थिती चांगली दिसून येत नाही. कारण ग्रामीण क्षेत्रात भांडवलप्रधान उत्पादन पद्धतीमुळे रोजगार निर्मिती करण्याचा दर मंदावलेल्या स्थितीत होता. जागतीकीकरणाच्या काळात मोठ्या प्रमाणात खाजगी क्षेत्र हे रोजगारात परिणामकारक वाढ करण्यास असमर्थ ठरले. या जागतीकीकरणाने कामगारांना संघटित क्षेत्रातून असंघटीत क्षेत्राकडे जावे लागले.कारण संघटीत क्षेत्रातील कामगारांना मिळणारे उत्पन्न हे असंघटित क्षेत्रातून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा तुलनेने अधिक असते. संघटित क्षेत्रातील कामगारांना रोजगार, संरक्षण, सोयी—सुविधा व इतर फायदे अधिक मिळतात.खाजगी क्षेत्रातील संघटित क्षेत्रात काम स्वीकारल्याने अधिक वेतन व समान कौशल्य असणाऱ्या कामगारांना सार्वजनिक क्षेत्राच्या बरोबरीने फायदे मिळतात. मात्र त्यांनी तुलना केल्यास सार्वजनिक क्षेत्रात अजुनही रोजगाराचे संरक्षण अधिक प्रमाणात टिकून आहे. जागतीकीकरणात अनौपचारिकता वाढली आहे म्हणजेच असंघटीत क्षेत्राचा व्याप वाढला आहे.त्याचबरोबरच जागतीकीकरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत अनौपचारिकपणा वाढत असताना दिसून येते

जागतीकीकरणाच्या प्रक्रियेत श्रमिकांना सर्वहारा बनविण्याची प्रवृत्ती वाढलेली आहे. बेरोजगारी, नैमित्तीकरण, अल्प वेतन, अंशकालीन काम, कमी व संरक्षणविरहित रोजगार या समस्यांना ग्रामीण क्षेत्रातील समुदायाला तोंड द्यावे लागत आहे. यंत्राच्या वापरामुळे उत्पादनातील व्यवस्थापनासाठी खर्च कमी व तंत्रज्ञानामुळे उत्पादन क्षमता वाढली आहे. ग्रामीण श्रमिकांची पिळवणूक जास्त होत असल्यामुळे नफ्याचे प्रमाण वाढले आहे. जागतीकीकरणच्या काळात व्यवस्थापन निगडीत नोकऱ्या आणि कामगारांच्या जागामध्ये विस्तार झालेला आहे. या काळात कामगार संघटनांची सौदाशक्ती बऱ्याच प्रमाणात कमी झालेली आणि सवलतीच्या प्रमाणामध्ये सौदा करण्याचा मार्ग स्विकारला आहे ग्रामीण श्रमिक संघटनांनी कामगारांची व वेतनाची कपात स्वीकारली आहे. त्यामुळे कामगारांना आपला रोजगार गमवावा लागला. आणि जागतीकीकरणामध्ये कामगारांची सौदाशक्तीची क्षमता कमी होत आहे.

## जागतीकीकरणाअंतर्गत ग्रामीण क्षेत्रात पूर्ण रोजगार व रोजगारातील स्थैर्य हे ध्येय :–

जागतीकीकरणाच्या काळात ग्रामीण समुदायातील स्त्री कामगारांचे प्रमाण हे काही उद्योगात वाढलेले आहे. स्त्री कामगार सहज नियंत्रित करू शकणारे आहे. त्यांना कमी वेतन, अशाश्वत काम करावे लागत आहे. मात्र नैमित्तीकरण वाढताना काही ठिकाणी स्त्री कामगारांचे प्रमाण वाढलेले दिसते.स्त्री व पुरुषांना स्थिर व उत्पादक कामाच्या संधी वाढविणाऱ्या दिर्घकालीन आर्थिक वृद्धी प्रक्रिये सोबतच पूर्ण रोजगाराचे धोरण राबविणे आवश्यक असते आणि यासाठी स्वातंत्र, समानता, संरक्षण, व मानवी प्रतिष्ठा अमलात आणली आहे. परंतु स्त्री कामगारांच्या प्रमाणात वाढ करणे हे देखील जागतीकीकरणाचे घोषवाक्य आहे त्यामुळे भारत सरकार जेव्हा पूर्ण रोजगार व कामा. तील स्थैर्य निर्माण करण्याऱ्या विचार करते. तेव्हा जागतीकीकरणाचा ओघ हा ग्रामीण समुदायाला पोषक नाही. त्यामुळे सरकार ग्रामीण समुदायातील कामगारांना ओद्योगाकडे व पुरक रोजगाराकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न करीत आहे म्हणजेच उपलब्ध रोजगारातून माणसाच्या कुटूंबाच्या गरजा भागविल्या जाणार नाही. तसेच जागतीकीकरणात मानवी संसाधनाचा विकास व प्रचार केला जात आहे.

## ग्रामीण श्रमभाव आणि लिंगभाव :–

१९९१, २००१ आणि २०११ च्या जनगणना लक्षात घेता दर वर्षी २.५ कोटी बालके जन्माला येतात असे शोध अहवालात नमूद करण्यात आले आहे. परिणामी वार्षिक २.५ कोटी लोक २१ वर्ष वयोगटात येतात आणि येत्या २० वर्षातही हे चित्र राहिल. २.५ कोटी लोक जनतेतल्या जनतेचा श्रम सहभाग दर ६० टक्के राहील असा अंदाज आहे. म्हणजेच दर वर्षी १.५ कोटी व्यक्ती श्रम बळात सहभागी होतील. तसेच अखिल भारतीय उच्च शिक्षण आजकाल २०१६–१७ मध्ये दर वर्षी सुमारे ८८ लाख विद्यार्थी पदवी शिक्षण पूर्ण करतात. यामध्ये रोजगार अथवा नोकरीची इच्छा नसलेल्याची संख्या ठरविण्यासाठी मदत झाली. ती ६६ लाख आहे. यानुसार ग्रामीण श्रमभाव व लिंगभाव यांच्या आधारावर श्रम बाजारात रोजगार आणि श्रमशक्तीच्या [illegible] [illegible] करता येते. ते खालील कोष्टकाच्या आधारे नमूद केले आहे.

तक्ता क्र.२

ग्रामीण श्रमभाव आणि लिंगभाव

| भारतीय श्रमशक्ती | एकक | २०१७ |
|---|---|---|
| अंदाजाप्रमाणे दरवर्षी भर पडणारी निव्वळ श्रमशक्ती | लाख | [illegible] |
| श्रम बाजारात स्वच्छेने सहभागी न होणारे ४० टक्के | लाख | –१०० |
| श्रम शक्तीत वार्षिक निव्वळ पात्र सहभागी | लाख | १५० |
| पदवीधारक वार्षिक | लाख | ८८ |
| गळती दर २५ टक्के | लाख | –२२ |
| श्रमशक्तीत दरवर्षी भर पडणारे आर्हता प्राप्त मनुष्यबळ ६६,००,००० | | |
| विना पदवी,विना आर्हता कामगार (निव्वळ १५० लाख)वार्षिक ८४,००,००० | | |

स्त्रीया आणि पुरूषांमध्ये जे शारीरिक भेद म्हणजेच लैंगिक फरक होय. मात्र लिंगभाव म्हणजे लिंगावर आधारलेल्या समाजाच्या भावना आणि लिंगभावातील भेदाला सतत नवीन समर्थन मिळत आहे. यापैकी ग्रामीण श्रमबाजार हा देखील समाजाचा एक अंग असून तो देखील लिंगभावाने प्रभावित होत असतो. शहरात व ग्रामीण भागातील उद्योगात, कामाची गती, एका वेगळ्या घडाळ्यानुसार चालते. स्त्रियांच्या वाट्याला येणारी कामे कमी दर्जाची आहे. श्रमबाजारात स्त्री–पुरूष असा भेद होत आहे.

## ग्रामीण समुदायात कमी वेतनावर काम करणाऱ्या स्त्रीया :–

जागतीकीकरणामुळे कमी वेतनावर काम करणाऱ्या स्त्री कामगारांचे प्रमाण वाढले. औपचारिक कामगारांची संख्या घटली आणि कामाचे तास वाढविण्यात आलेले आहे. त्याचबरोबर असंघटीत क्षेत्रात घरगुती उद्योगातील श्रमिकाचे शोशण केले जात आहे. उद्योजकाचे कमाल खर्च सुद्धा कमी होत आहे. घरगुती उद्योगातील अकुशल व कमी कौशल्य असलेल्या श्रमिकांमध्ये स्त्रियांची संख्या जास्त असते. यावेळी किमान मजूरीपेक्षा कमी मोबदला स्त्री–कामगारांना दिला जातो.

## ग्रामीण समुदायातील कामगारांच्या रोजगावर झालेला परिणाम :–

सध्या अंदाजित केलेल्या संपूर्ण जगातील खुल्या बेकारीचा दर १८८ मिलीयन पर्यंत पोहचलेला आहे. जागतीकीकरणामुळे योगायोगाने लोकसंख्या स्थानांतरण संधीची स्थिती निर्माण झाली व ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतर वाढले आहे. तसेच शहरी असुरक्षित व असंघटीत क्षेत्राचे प्रमाण वाढले आहे. त्या काळात स्वस्त कामगार उपलब्ध होऊ लागले असून यामध्ये स्त्री कामगारांचे प्रमाण अधिक वाढले आहे.अकुशल व अप्रशिक्षत कामगारांना पर्याय उपलब्ध नसल्याने अल्प वेतनावर व हलक्या दर्जाचे काम करतात.

## निष्कर्ष :–

वरील चर्चेवरून असे दिसते की जागतीकीकरणामुळे ग्रामीण समुदायाच्या कुशल, अकुशल, रोजगार, श्रमबाजार, स्त्री–पुरूष लिंगभाव यावर काय परिणाम होतो. तसेच जागतीकीकरणाचा ग्रामीण भागापेक्षा शहरी भागावर अधिक परिणाम होतो. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये प्रामुख्याने कृषी व कृषीवर आधारित उद्योगामधील कामगारांशी संबंधित आहे. स्त्री कामगार हा देखील एक ग्रामीण क्षेत्रातील श्रमबाजाराचा एक महत्वाचा घटक आहेत. त्यामुळे जागतीकीकरणाचा ग्रामीण समुदायावर एकूण विशिष्ट पैलूसाठी होणारा अभ्यास महत्वाचा ठरतो.

## संदर्भग्रंथ सूची :–


१) सुंदरम, रुद्र–दत्त, (२००६)– "भारतीय अर्थव्यवस्था," ५३ आवृत्ती. एस.चंद ॲण्ड कंपनी लि. नई दिल्ली–११००५५, २००६.पृ.२६५–२३९

२) शर्मा. अलख. एन. (२००६)– "भारतातील रोजगार आणि श्रम बाजारातील सुधारणा," २७ मे २००६.पृ. २१९५–२२०९

३) लाल ॲण्ड लाल. (२०१८)"भारतीय अर्थव्यवस्था". पृ.११·२३–२१·५

४) खेर.सी.पी. (२००८) "जागतीकीकरण, समस्या, आशय आणि अनुभव"" दिलीप प्रकाशन प्रा.लि द्वितीयावृती पृ.६३–८८

५) खेर.सी.पी. (१९९९) "आर्थिक सुधारणाचे नवे पर्व." दिलीप प्रकाशन प्रा.लि. प्रथमावृत्ती , पृ. २३–३२

६) खेर.सी.पी (२००४) जागतीक अर्थकारणाचे नवे संदर्भ" दिलीप प्रकाशन प्रा.लि. प्रथमावृती पृ. ५२–६८